**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र. १३४/२०२६**

**तक्रारकर्ता, श्री. मनोज कोरडे**
**दत्त निवास, रामनगर, वीर सावरकर मार्ग,**
**लालचक्की चौक, स्टेशन रोड, उल्हासनगर-४**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा क्रिडा विभाग प्रमुख,
क्रिडा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त (क्रिडा),
उल्हासनगर महानगरपालिका

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०८.२०२५ | ०८.०९.२०२५ | १३.११.२०२५ | १०.१२.२०२५ |

तक्रारकर्ता श्री. मनोज कोरडे यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी करण्यात हयगय,दुर्लक्ष व हलगर्जीपणा केल्याप्रकरणी तक्रार, असे कारण नमूद करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दि.०६/०४/२०२६ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

तक्रारकर्ता यांच्या सदर तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता, तक्रारकर्ता यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६ अन्वये माहिती अर्ज दाखल केला असल्याचे व सदर अधिनियमातील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल अर्ज दाखल केला असल्याचे दिसून येते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, मुख्य माहिती आयुक्त व इतर विरुध्द मणिपूर राज्य सरकार व इतर, सिव्हील अपिल क्र. १०७८७-१०७८८/२०११ या प्रकरणी दि. १२/१२/२०११ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ तसेच कलम १९ ची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच सदर आदेशाच्या परिच्छेद ३२ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे -

*"In the facts of the case, the appellant after having applied for information under section 6 and then not having received any reply thereto, it must be deemed that he has been refused the information. The said situation is covered by Section 7 of the Act. The remedy for such a person who has been refused the information is provided under Section 19 of the Act."*

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १२/१२/२०११ च्या आदेशामधील परिच्छेद ३५ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ व कलम १९ मधील प्रक्रिया पूर्णत: भिन्न आहेत. कलम १८ चे अधिकार हे पर्यवेक्षकीय स्वरुपाचे अधिकार आहेत, तर कलम १९ अंतर्गत अपिलाची प्रक्रिया स्पष्ट केली

आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीस माहिती नाकरण्यात आलेली आहे किंवा माहिती मिळालेली नाही, अशा व्यक्तीने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक तरतूदींचे पालन करुन माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे. परिच्छेद ३५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे -

*"The contention of the appellant that information can be accessed through Section 18 is contrary to the express provision of Section 19 of the Act."*

त्यानुसार अपिलार्थी /तक्रारदार यांनी माहिती मिळविण्यासाठी कायद्याने ठरवून दिल्यानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेनुसार आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. तथापि तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता, या तक्रार प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली असल्याचे स्पष्ट होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१२/१२/२०११ च्या निर्णयान्वये दिलेले निर्देश विचारात घेता, तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेला तक्रार अर्ज मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाशी सुसंगत नसल्याने, सदर तक्रारीवर अधिक कार्यवाहीची आवश्यकता दिसून येत नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ मे, २०२६